# ‘समांतर’वर आज कार्यशाळा

## संत एकनाथ येथे १० ते १२, सिडकोत ३ ते ५ या वेळेत होणार कार्यशाळा

प्रतिनिधी | औरंगाबाद

समांतर जलवाहिनीचा प्रकल्प नेमका कसा आहे, हे जाणून घेण्याची संधी पालिकेच्या वतीने औरंगाबादकरांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांच्या विविध शकांचे निरसन करण्यासाठी सकाळी १० ते १२ या वेळेत संत एकनाथ रंगमंदिर येथे, तर दुपारी ३ ते ५ या वेळेत सिडकोतील संत तुकोबाराय नाट्यगृहात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

समांतर प्रकल्पाविषयी नागरिकांच्या वतीने वेगवेगळे मुद्दे उपस्थित करण्यात येतात. पालिकेचे अधिकारी त्यांच्यापरीने शंकानिरसन करत असले तरी नागरिकांचे समाधान होत नाही. त्यामुळे या प्रकल्पावर प्रारंभीपासून टीका होते.

टीका करणाऱ्यांना हा प्रकल्प समजावा यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याबाबत गेल्या दीड वर्षापासून नियोजन करण्यात आले होते. मात्र, ते अजूनही शक्य झाले नाही. येत्या १ जानेवारीपासून समांतर प्रकल्प सुरू होण्याबरोबरच पाणीपुरवठ्याची जबाबदारी ठेकेदाराच्या हाती सोपवण्यात येणार आहे. त्याआधी हा प्रकल्प नागरिकांना समजावा यासाठी रविवारी (३० डिसेंबर) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे कार्यकारी अभियंता सखाराम पानझडे यांनी सांगितले.